२३) सदर कर्मचारी हे गट ड पदावर कार्यरत असून त्यांना गट क पदावर नेमणूक देण्यात आल्याने त्यांची गट ड पदावरील सेवा ही फक्त सेवानिवृत्ती साठी धरण्यात यावी.

२४) सदर कर्मचारी यांना वर्ग-०४ मधुन वर्ग-०३ मध्ये नेमणुक दिल्याने हजर दिनांका पासुन शासन विहीत नियम व तरतुदी नुसार वेतन लागु करावे.

२५) **उपरोक्त कर्मचा-यांनी वर्ग ४ पदावरुन वर्ग ३ पदावर नियुक्ती दिल्यानंतर मानिव दिनांक तसेच जेष्ठताबाबत जि प.विरोधात भविष्यात कोणतीही मागणी /दावा दाखल करणार नाही या बाबत १००/- चे प्रतिज्ञापत्रावर लिहुन तसे प्रतिज्ञापत्र या कार्यालयात हजर झालेपासुन आठ दिवसाचे आत सादर करण्याची जबाबदारी संबधित कर्मचारी यांची राहिल कर्मचा-यांनी दिलेल्या मुदतीत प्रतिज्ञापत्र सादर न केल्यास सदर कर्मचा-याची गट क पदावरील नियुक्ती आपेआप संपुष्टात येईल याची नोद घ्यावी (संबधित कर्मचा-यांने दिलेले प्रतिज्ञापत्र कार्यालयाने तात्काळ सामान्यय प्रशासन विभागास सादर करावे )**

सदर आदेशाची नोंद संबधीतांचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात येवुन सदर आदेशाची शासन नियमानुसार तांतडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.सदर आदेशानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल तांतडीने या कार्यालयाकडेस सादर करण्यात यावा.

१०।७।२४
**अंकित (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,जळगांव**

प्रत - माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी
१) संबंधितांना त्यांचे रहाते पत्यावर (रजि.पोष्टाने)
२) महिला व बाल विकास अधिकारी जिल्हा परीषद जळगांव यांना
१) बाल विकास प्रकल्प अधिकारी एबाविसेयो प्रकल्प कार्यालय ०१ चाळीसगांव ..जि.जळगांव
२) गट विकास अधिकारी पंचायत समिती,-चाळीसगांव जि.जळगांाव

१०।७।२४
**अंकित (भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,जळगांव**

५) **सदर उमेदवारांची नेमणुक पूर्व चारित्र्य व वर्तणुक बाबत सक्षम प्राधिका-याकडील पडताळणीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे. अशा पडताळणी / चौकशी अंती काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवार हे शासन परिपत्रक दि.२७/९/१९६० मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या सेवेतून कमी करण्यात येतील. सदर तत्पुर्वी परीचर पदी झालेले असल्यास खात्र करुन घ्यावे.**

६) **सदर उमेदवारांनी नियुक्तीचे कार्यालयास हजर होण्यापूर्वी म. जिल्हा शल्य चिकित्सक जळगांव यांचेकडून वैद्यकीय तपासणी करून घेवून या जिल्हा परिषदेमध्ये सदर पदावर सेवेसाठी शारिरिक दृष्ट्या पात्र असले बाबतचा वैद्यकीय दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर उमेदवाराने या बाबत म. जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडेस सादर करावयाचे पत्र त्याचे सदरचे नियुक्तीचे कार्यालय प्रमुखाकडून प्राप्त करावयाचे आहे.**

७) **शासन निर्णय दि.१२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत,** उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समिती कडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालय प्रमुख/विभागप्रमुखामार्फत संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित जात पडताळणी समितीने उमेदवारांचे जात पडताळणीचे प्रस्ताव सहा महिन्याच्या आत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करून अनुसुचित जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.

याप्रमाणे मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर उमेदवाराची नेमणूक रद्द होवून त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जावू शकतील. या बाबतचे हमीपत्र रू.१००/- चे प्रतिज्ञापत्रावर हजर होतेवेळी संबंधित उमेदवाराने कार्यालयास भरून दयावयाचे आहे.

८) सदर नियुक्तीचे कार्यालयात हजर होण्यापूर्वी सदर उमेदवारांनी यापूर्वी नोकरी (खाजगी संस्थेमध्ये किंवा खाजगी ठिकाणी)करीत असलेल्या सर्व पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे.

९) सदर उमेदवारांनी हजर झालेनंतर तीन महिन्याचे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहीत नमुन्यातील आवश्यक ते विवरणपत्र संबंधित कार्यालय प्रमुखांचे समक्ष भरून देणे आवश्यक आहे. सदर विवरणपत्र संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.

१०) संबंधित कार्यालय प्रमुखांनी या आदेशातील उमेदवारांना हजर करून घेतांना त्यांचेकडून त्यांची जन्मतारीख, जात, जमात, शैक्षणिक अर्हता, नियुक्तीचा प्रवर्ग इ. माहिती दर्शविणारी सर्व मुळ प्रमाणपत्रके तपासणी करून घेतल्याशिवाय त्यांना हजर करून घेण्यात येवू नये.

११) सदर उमेदवारांनी संदर्भ दि.२४/९/२००१ व दि.२१/११/२००२ मधील शासन निर्णयानुसार विहीत केलेली संगणक विषयाची परिक्षा नियुक्ती दिल्यापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुती अधिकाऱ्यांना सादर करावे.अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआपच संपुष्टात येईल.

१२) महा.जिल्हा परिषद,जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ मधील नियम ४ मधील तरतूदीनुसार विहीत मुदतीत सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.जर मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास नियम ५ मधील तरतुदीनुसार त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

१३) संबंधित उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालय प्रमुखाकडे '' हमीपत्र '' करून देणे आवश्यक आहे. कार्यालय प्रमुखांनी देखील असे '' हमीपत्र '' उमेदवाराने करून दिल्याशिवाय हजर करून घेवू नये. सदरचे '' हमीपत्र '' संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात चिकटविण्यात यावे.

**'' हमीपत्र ''**

'' माझी जळगांव जिल्हा परिषदेकडे **"अंगणवाडी पर्यवेक्षिका"** या पदासाठी अनुकंपा तत्वावर नेमणुक झालेली आहे. सदरची नेमणुक पुर्णतः तात्पुरती व अस्थाई स्वरूपाची असून माझी सेवा मला पूर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल. याची मला जाणीव असून त्या तत्वावर मी सदर नेमणुक स्विकारीत आहे. '' तसेच सदर पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केल्याशिवाय अन्य जिल्हा परिषदेत बदलीने नेमणुक होण्यासाठी अर्ज करता येणार नाही, याची मला जाणीव असून सदर अटीस मी सहमत व बांधील आहे.

**समक्ष**

**कार्यालय प्रमुखांची सही व हुद्दा व दिनांक.** **उमेदवारांची सही व दिनांक**

१४) अविवाहित महिला उमेदवार/विधवा महिला यांचेबाबतीत त्यांनी विवाह / पुनर्विवाह केला नसल्याबाबत शपथपत्र उपस्थित होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.

१५) शा.नि.२६/०२/२०१३ नुसार दिवंगत राज्य शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटूंबामध्ये फक्त विवाहीत मुलगी हे एकमेव आपत्य असल्यास विवाहीत मुलीच्या बाबतीत तिच्यासह तिच्या पतीकडूनही दिवंगत शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटूंबीयांचा तो/ती सांभाळ करील असे प्रतिज्ञापत्र उपस्थित होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील. तसेच अनुकंपा तत्वावर एकदा नियुक्ती मिळाल्यानंतर तो/ती (उमेदवार) कुटूंबीयांचा सांभाळ करीत नसल्याचे आढळल्यास त्याची/तीची शासन सेवा तात्काळ समाप्त करण्यात यावी. यासंदर्भात आवश्यक हमीपत्र (Undertaking) उपस्थित होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील. तसेच अविवाहीत मुलीला अनुकंपा नियुक्ती मिळाल्यानंतर तिचा विवाह झाल्यास विवाहाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत तिच्या पतिकडूनही तसे हमीपत्र घेवून कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.

१६) संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

१७) उमेदवारास महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.२८ मार्च २००१ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. अनुकंपा उमेदवारास मयत कर्मचाऱ्याचे कुटूंबातील इतर सदस्याचे पालन पोषण / सांभाळ करणेबाबत शपथपत्र उपस्थित होतांना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.

१८) वरील उमेदवारांच्या बाबतीत अनुकंपा नियुक्तीकरीता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसुन आल्यास अगर नियुक्तीचे वेळी/नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती अथवा कागदपत्रे चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणतीही वेळी रद्द करण्यात येईल. कोणतीही माहिती व कागदपत्रे चुकीची/ खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

१९) सदर उमेदवारांची नेमणुक एक वर्षाच्या शिकाऊ कालावाधीसाठी करण्यात येत आहे. तथापि सदर कालावधीत त्यांचे कामकाज समाधानकारक नसल्यास सदर कालावधी पुढे आणखी वाढविण्यात येईल.

२०) **शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४,दि.३१/१०/२००५ नुसार उमेदवारांना ''परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना''(राष्ट्रीय निवृत्ती योजना NPS) लागु राहील** आणि तसेच सदर उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) चे अंशराशीकरण नियम १९८४ नुसार असलेली निवृत्तीवेतन योजना आणि पूर्वीच्या कर्मचा-यासाठी असलेली सर्वसाधारण भाविष्य निर्वाह निधी योजना लागु राहणार नाही.

२१) वरील उमेदवारांनी वेळोवेळी निर्धारीत शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व वेळोवेळी निश्चित करुन देण्यात येणाऱ्या परिक्षा, प्रशिक्षण विहित मुदतीतच उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

२२) **"अंगणवाडी पर्यवेक्षिका"** सदर पदावर किमान ५ वर्षे पुर्ण झाल्याशिवाय अन्य जिल्हा परिषदेमध्ये आंतर जिल्हा बदलीने नेमणूक देण्यासाठी विचार करता येणार नाही.

**वाचा :** १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७.

२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई ३२ कडील

अ) शासन परिपत्रक क्र न्यायप्र.१००३/१९/प्र क्र.२/०३(भाग-२)/१६-अ दि २५/१०/२००५

ब) शासन निर्णय क्रमांक-प्रनिम२००७ प्र.क्र.४६/०७/१३-अ,दि.१९/१०/२००७

क) शासन निर्णय क्रमांक-प्रनिम२००८ प्र.क्र.६८/०८/१६ अ दि०१/११/०८

ड) शासन परिपत्रक बीसीसी २००८/प्र.क्र२४२/०८/१६-ब,दि.१७/१०/२००८

इ) शासन निर्णय क्र. अकंपा/१०९३/२३३५/प्रक्र/९०/९३/आठ दि.२६/१०/९४

ई) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/ २०००, दि.२४/९/२००१

फ) शासन निर्णय क्र. अकपा-१०००/प्र.क्र.५९/२०००, दि.२१/११/२००२

ग) शासन निर्णय क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२ ऑगस्ट २००५

घ) शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्रक्र.१०६४/२०११/१६-ब दि.१२/१२/२०११

च) शासन निर्णय क्र.अकंपा/१०१३/प्र.क्र.८/आठ दि.२६/०२/२०१३.

) शासन निर्णय क्र संकिर्ण/१११८/प्र क्रं ३९/१६ अ दि १९ डिसेंबर २०१८

) शासन निर्णय क्रं बीसीसी २०१८/प्र क्र ५८१ए/२०१८ /१६ब दि १९ डिसेंबर २०१८

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि १० जुन २०१९

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२१९/प्र क्रं ५६/आठ दि ११ सप्टे-२०१९

) शासन निर्णय क्रं अकंपा-१२२१/प्र क्रं १८६/आठ दि २६ ऑगस्ट-२०२१

३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ कडील

अ) शासन परिपत्रक क्र एपिटि २००९/प्र.क्र३०३ (अ) आस्था-दि १९/३/२००८

ब) शासन परिपत्रक क्र .एपिटि-२००९/प्र.क्र.१७० (अ) आस्था-८ दि २ जुन २००९

क) शासन परीपत्रक क्रं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/ आस्था-८ दि ४ जाने २०२०

ड) शासन परीपत्रक कं संकिर्ण-२०१८/प्र क्रं १७३/आस्था-८ दि ५ फेबवारी २०२०

४) महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग,शासन निर्णय क्र.एबाविक/२००३/प्र.क्र.४३८/कस-६, द.१४/१/२००४

५) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५ /का-४१५/का-२, दि.२५/५/२००१

६) मा.आयुक्त एकात्मीक बाल विकास सेवा योना महाराष्ट्र राज्य सीबीडी बेलापूर नवी मुंबई यांचेकडील क्र.मविसे/प्रशासन का-१/१०२७/२००९, दि.२३/४/२००९

७) या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-११/आरआर/२९६/२०२४ दि. २१/०७/२०२४

८) वित्त विभाग शासन निर्णय क्र.असक-१०१०/प्रक्र.१/२०१०/वित्तीय सुधारणा १ दि. ५/०६/२०१०

९) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगांव यांची मान्य टिपणी दि.१०/०७/२०२४

---

**नियुक्ती आदेश**

जा.क्र.साप्रवि-आस्था-११-आरआर-९४४ -२०२४
सामान्य प्रशासन विभाग जि,प,जळगाव
दिनांक - १० /०७ /२०२४

उपरोक्त वाचामधील आदेश क्र. ७ मध्ये नमुद खालील कर्मचारी यांना परिचर वर्ग ४ या पदावर नेमणूक देण्यात आलेली आहे. नियुक्ती देतेवेळी त्यांची शैक्षणिक अर्हता ही वर्ग ३ पदाची होती परंतु पदांचे उपलब्धतेअभावी सदर कर्मचाऱ्यांना गट क पदाचे ऐवजी गट ड परिचर वर्ग ४ हया पदावर अट क्र. ०२ " दि. २३/०८/१९९६ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार गट क चे पद उपलब्ध होताच संबंधितास गट क मध्ये शासन नियमानुसार नियुक्ती देणेची कार्यवाही करण्यात येईल" या अटीवर परिचर वर्ग ४ पदी नियुक्ती देण्यात आली होती.

तरी सद्यस्थितीत **"अंगणवाडी पर्यवेक्षिका"** संवर्गाचे पदे रिक्त झाल्याने व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.अकपा १०९५/प्रक्र.३४ अ/आठ दि. २३/०८/१९९६ मध्ये "गट क मधील पदावर अनुंकपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट ड मधील पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती करण्यात यावी अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने करण्यात येणाऱ्या पदावरील समजण्यात यावी" अशी तरतुद असल्याने या आदेशान्वये जिल्हा सेवा (वर्ग-तीन) एकात्मीक बाल विकास सेवा योजना (तांत्रिक सेवा) तृतीय श्रेणीमधील **"अंगणवाडी पर्यवेक्षिका"** या पदावर समयवेतनश्रेणीतील वेतन बँड एस-१३ रु.३५४००-११२४००/- या वेतनश्रेणीत खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणुक करीत असून त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहेत. सदर नेमणुक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे संपूर्ण नांव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापीत केलेले कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती प्रिती भुषणकुमार देवरे (पाटील) प्रा.आ.केद्र मंगरुळ ता पारोळा | इमाव | इमाव | एकात्मीक बाल विकास योजना प्रकल्प कार्यालय ०१-चाळीसगांव बीट मेहुणबारे |

**सदर नेमणूक ही खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.**

१) सदर नेमणुक ही पुर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास नोटीसीशिवाय केव्हाही कारण न दाखविता कमी करण्यात येईल अशी आहे.

२) सदर पदासाठी·वेतनासाठी होणारा खर्च हा शासकीय मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरीता कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

३) सदर उमेदवारांना अनुकंपा तत्वावर देण्यात आलेली नेमणुक नाकारता येणार नाही. सदरची नेमणुक नाकारल्यास अनुकंपा तत्वावरील नेमणुक रद्द करण्यात येईल, त्यानंतर अनुकंपा तत्वावर नेमणुक देण्यात येणार नाही. सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत नियुक्तीचे कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे. जर ते सदर मुदतीत हजर झाले नाहीत तर त्यांची नेमणुक रद्द म्हणून समजण्यात येईल.

४) सदर उमेदवारास सदर पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगांव चे जिल्हा निधीत त्यांना जमा करावा लागेल.